## आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. एस. चव्हाण वकील.

८. मी तक्रारदार संस्थेच्या मुख्य कार्यालयात कायदा विभागात कार्यरत आहे. मी तक्रारदार संस्था मल्टीस्टेट होण्यापूर्वी पासून तेथे कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला वसूलीचे अधिकार पुणे सहकार आयुक्तालया मार्फत दिले जातात. मी तक्रारदार संस्थेत कार्यरत असल्यापासून मला वसूलीचे अधिकार दिलेले आहेत. आमच्या संस्थेत संचालक मंडळ व कार्यकारी समिती आहे. आम्हाला न्यायालयीन प्रकरण दाखल करण्याचे अधिकार कार्यकारी समिती देखील देऊ शकते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या संस्थेचे आज रोजीचे संपुर्ण कामकाज महाराष्ट्र सहकार कायद्यातील तरतूदी प्रमाणे चालते.

९. आमची संस्था दि.१७.०२.२०१७ रोजी पासून मल्टीस्टेट संस्था म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे चालवण्याचे अधिकार केवळ मुख्य कार्यकारी अधिकारी देऊ शकतात. मला सदर प्रकरण चालवण्या बाबत दि.१८.०६.२०२२ रोजी देण्यात आलेला असून मला त्याचा ठराव क्रमांक आठवत नाही. मी सदर ठरावा व्यतिरिक्त मला अधिकृत केल्याबाबत इतर कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१०. आरोपीचे आमच्या संस्थेकडे सदर खटल्यातील प्रकरणा व्यतिरिक्त इतर कर्ज प्रकरण नाही. आमच्या संस्थे मार्फत तारण गहाणकर्ज देताना मिळकतीचा शोध अहवाल, मूल्यांकन दाखला व उतारे पाहिले जातात. त्याचे शुल्क आम्ही कर्जदारा कडून घेत असतो. आम्ही आरोपीच्या तारणगहाण मिळकतीचे २०१८ साली मूल्यांकन केले होते. आम्ही त्याचे मूल्यांकन कर्ज मंजूर करण्यापूर्वी केले होते.

११. आमची संस्था आर. बी. आय. च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे काम करते. मला गहाण मिळकतीचे आर. बी. आय. च्या नियमा प्रमाणे पुर्नमूल्यांकन करावे लागते याची माहिती आहे. मला सदर मार्गदर्शक तत्वे आर. बी. आय. ने कधी प्रसारीत केली याची तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मंजूर झाल्यानंतर ते थकीत होईपर्यंत त्याच्याशी मुख्य कार्यालयाचा कोणताही संबंध येत नाही. साधारणपणे

कर्जाचा देय हप्ता थकीत झाल्यानंतर ९० दिवसांनी किंवा कर्जाची मुदत पुर्ण झाल्यानंतर ते कर्जप्रकरण एन. पी. ए. होते. आमच्या संस्थेच्या प्रत्येक शाखेत कायदा सल्लागार आहे. आमच्या संस्थेच्या वार्षिक अहवाला वरती संस्थेच्या कायदेशीर सल्लागारांची नावे छापलेली असतात.

**१२**. आमच्या मुख्य शाखेचे आर. एन. चव्हाण व इतर काही विधिज्ञ हे कायदेशीर सल्लागार आहेत. आमच्या मुख्य कार्यालयात पी. जे. वाघ, लुईस शहा हे देखील कायदेशीर सल्लागार आहेत.

**१३**. मी संस्थेच्या कापशी, राधानगरी, मुंबई, गारगोटी या शाखांत काम केले आहे. मी आजरा मुख्य कार्यालयात कार्यरत असून आजरा शहरातच राहतो. मला या प्रकरणा मध्ये आरोपीला नोटीस पाठवलेल्या विधिज्ञांचे पुर्ण नाव माहिती नाही. त्यांचे वय साधारणपणे ३५ वर्षांच्या आसपास असून त्या महिला आहेत. मला त्या कोठे वकिली व्यवसाय करतात याची माहिती नाही. त्यांचे कार्यालय तहसिलदार कार्यालया पाठीमागील शिवाजीराव इंजल यांच्या घरामध्ये आहे. मला त्यांच्या घराचा घर क्रमांक सांगता येणार नाही. मला आजरा, चंदगड व गडहिंग्लज न्यायालयात शितल टी. पाटील नावाच्या कोणत्याही महिला विधिज्ञ वकिली व्यवसाय करत नसल्याची माहिती नाही.

**१४**. मी जून २०२२ च्या दुस–या आठवडयात शितल पाटील वकिलांना भेटलो होतो. मला मी त्यांना निश्चित कोणत्या तारखेला भेटलो होतो याबाबत सांगता येणार नाही. मी आरोपीला दि.०७.०७.२०२२ रोजी कायदेशीर नोटीस पाठवली होती. आरोपीने सन २०१८ मध्ये आमच्या संस्थेकडून कर्ज घेतलेले आहे. दि.०४.०५. २०२२ रोजी आरोपी कडून आमच्या संस्थेला १३ लाख ८५ हजारांपेक्षा जास्त रक्कम येणे होती. आमच्या संस्थेने आरोपीला दि.०६.०८.२०१८ रोजी १० वर्षांच्या मुदती करीता १२ लाखांचे कर्ज दिले होते. आरोपीला सदर कर्जाच्या परतफेडीसाठी १८,७००/– रुपयांचा मासिक हप्ता देण्यात आला होता.

**१५**. आरोपी नोकरीला असून त्याने घर तारण दिल्यामुळे त्याला आमच्या संस्थेने कर्ज पुरवठा केला होता. आरोपीचे निपाणी येथे घर आहे. आमच्या संस्थेने दि.२८. ०५.२०२४ रोजी आरोपीचे घर जप्त करुन ताब्यात घेतले आहे. आमच्या संस्थेची निपाणी येथे शाखा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ग्राहकांना कर्ज देताना त्यांच्याकडून कागदपत्रांसह कोरे धनादेश घेतो. आम्ही कर्जदारा कडून हप्त्याची रक्कम वसूल करण्यासाठी क्रॉस चेक घेत नाही. आरोपी रोखीने कर्जाचा हप्ता भरत होता. आरोपीच्या कर्जाचा पहिला हप्ता सप्टेंबर २०१८ पासून चालू झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दि.३१.०७.२०२२ रोजी पर्यंत कर्जाचे नियमित हप्ते भरलेले आहेत.

**१६**. आरोपीने स्वतःहून कर्जाची रक्कम फेडण्यासाठी वादातील धनादेश दिला होता. आरोपीने मार्च २०२० पर्यंत कर्जाचे हप्ते भरलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपी कडून त्याने भरलेल्या हप्त्याची रक्कम वजा करुन होत असलेल्या कर्जाच्या रकमे बाबत वादातील धनादेश घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या कर्जाची मुदत संपलेली नसून देखील आम्ही त्याच्याकडून घेतलेल्या धनादेशावरती रक्कम टाकून तो बँकेत सादर केला होता. वादातील धनादेशा वरील रक्कम आरोपीने लिहिलेली आहे. वादातील धनादेश हा दि.०४.०५.२०२२ रोजीचा आहे. आमच्या संस्थेने तो दि.०८.०६.२०२२ रोजी वटण्यासाठी टाकला होता. आरोपीने विनंती केल्यामुळे आम्ही उशिराने धनादेश वटण्यासाठी सादर केला होता.

**१७**. मी आमच्या संस्थेच्या निपाणी शाखेत कामानिमित्त जात असतो. आम्ही कर्जदारांचे सर्व धनादेश मुख्य शाखेकडे वटवण्यासाठी घेत असल्यामुळे आरोपीचा धनादेश आजरा येथे सादर करण्यात आला होता. आम्हाला वादातील धनादेश निपाणी शाखेत वटवण्यास कोणतीही अडचण नव्हती. आरोपीच्या तारण घराचे मूल्यांकन २५ लाख ५४ हजार होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने भरलेली हप्त्याची रक्कम वजा न करता आम्ही धनादेशा वरती चुकीची रक्कम टाकली आहे.

**१८**. आम्ही आरोपीचा धनादेश अनादरीत झाल्यानंतर त्याच्याशी नोटीस व्यतिरिक्त

इतर मार्गांनी संपर्क केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कर्जप्रकरण मंजूर करताना आरोपी कडून घेतलेल्या धनादेशाचा गैरवापर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील तारीख आमच्या संस्थेच्या कर्मचा–यांनी लिहिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कर्जप्रकरण थकल्यामुळे वादातील धनादेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटा धनादेश न्यायालयात दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ३१.१०.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते